माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२३/अपील/१०/२०२३/0525 दिनांक:१२.१०.२०२३

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०५.०८.२०२३ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | २४.०८.२०२३ |
| प्रथम अपील (दोन) प्राप्त झाल्याचा दिनांक | : | १३.०९.२०२३ |
| प्रथम अपील निकाली काडल्याचा दिनांक | : | १२.१०.२०२३ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. १०/२०२३ व ११/२०२३**

श्री. रतनेश आलमचंदानी **... अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई **... प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक ०५.०८.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०७.०८.२०२३ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक ०५.०८.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.०८.२०२३ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक १२.०९.२०२३ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दोन अर्ज दाखल केली. (दोन्ही अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक १३.०९.२०२३ रोजी प्राप्त झाले).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक ०३.१०.२०२३ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०९.१०.२०२३ रोजी दोन्ही अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. परंतु सुनावणीसाठी आपीलार्थी स्वतः उपस्थित न राहता त्यांच्या प्रतिनिधीना उपस्थित राहण्याचे अधिकार पत्र दिले. सुनावणी दरम्यान प्रतिनिधीनी सदर अधिकारपत्र प्रथम आपीलीय अधिकारी यांना सादर केले. त्या आनुषंगाने अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी व

जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले.

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

१. आपल्या भांडुप ग्राहक न्यायमंचामध्ये व कल्याण न्यायमंचामध्ये जेव्हापासून नवीन नियुक्त्या करण्यात आल्यापासून किती वेळा सुनावणी रद्द करण्यात आल्याच्या आजपोवतो स्वाक्षरी प्रती मिळाव्यात.
२. सुनावणी रद्द कोणत्या कारणाने करण्यात आल्याच्या दिनांक व कारणासह स्वाक्षरी प्रती मिळाव्यात.
३. आपल्या भांडुप ग्राहक न्यायमंच व कल्याण न्यायमंचामध्ये कोणत्या कोणत्या दिवशी उपस्थिती अध्यक्ष व सदस्याची जेव्हापासून नियुक्ती आहे तेव्हापासून आजपोवतो उपस्थिती रेकॉर्डच्या प्रती स्वाक्षरी मिळाव्यात.
४. आपल्या दोन्ही न्यायमंचामध्ये सुनावणी व ऑर्डर करण्याकरीता किती दिवस उपस्थिती अनिवार्य आहे त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी.
५. आपल्या दोन्ही न्यायमंचामध्ये ६० दिवसाचे आत सुनावणी घेऊन आदेश देणे बंधनकारक असताना सध्या परिस्थिति ७० दिवसा झाले तरी आदेश देण्यात आले नाही. सदर जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याची आहे व त्यांचे नाव हुद्दयासह स्वाक्षरी प्रत मिळावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

संबंधीत माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच ग्राहक तक्रार निवारणा विषयीची माहिती आयोगाच्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २०२० मध्ये उपलब्ध आहे. सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

सदर माहिती संकेत स्थळावर उपलब्ध नाहीत.

दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली.

**अपीलामध्ये सुनावणी दरम्यान निदर्शनास आलेले मुद्दे:**

अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती मुद्दा क्र १,२,३,४ व ५ या कार्यालयात उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तसेच, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल संबंधित विनियम, २०२० हे आयोगाच्या

www.merc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. मुद्दा क्र. १,२,३,४ व ५ साठी सदर अर्ज संबंधित कार्यालयाकडे वर्ग करणे अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता आपीलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत आहे. माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र. १,२,३, ४ व ५ च्या नुसार मागीतलेल्या माहितीसाठी सदर अर्ज संबंधित कार्यालयांना ०५ दिवसाच्या आत वर्ग करण्यात यावा.

जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.

## निर्णय

**अपील मंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

**सदर माहितीचा अर्ज माहिती मुद्दा क्र. १,२,३,४ व ५ साठी संबंधित कार्यालयांना ०५ दिवसाच्या आत वर्ग करण्यात यावा असे आदेश जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई यांना देण्यात येत आहेत.**

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रती,

श्री. रतनेश आलमचंदानी
शिव अपार्टमेंट हरमन मोहता गट,
शॉप नं. १२ पो. शहाड, उल्हासनगर-१
जि. ठाणे, पिनकोड ४२११०३.

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रत पुढील कार्यवाहिस्तव,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई